| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, बीड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १०.१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ऑनलाईन | सर्वे नं. १३७ व २०१ मधील जमिनीचा इ.स. १८८० ते आज पर्यंत झालेले वारस नोंद फेरफार व खासरा पत्रक |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दिनांक २६.१०.२०२३ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना माहिती विस्तृत असल्याने माहितीचे अवलोकन करणेविषयी सुचित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोज सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांना त्यांना माहिती प्राप्त झालेली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. प्रकरणी अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागविली असल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अधिनियमाचे कलम २(J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तीक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, बीड यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४१५/२०२४ 9565 दि. 8/8/2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ३४ व ३५ | द्वितीय अपील क्रं. २०४१ व ४३६८/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. तलहाबीन अली मकरानी<br>रा. मु. पो. अरब गल्ली ता. पाटोदा जि. बीड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १८.३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०९.१.२०२४ | दि. ९ व १४.८.२०२३ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली |
| ३१.१.२०२४ | अशोक किसन शिंदे व इतर अर्ज/निवेदन प्रकरणी काय कार्यवाही करण्यात आली |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाने केलेल्या अर्ज/निवेदनाची माहिती मागविली असल्याने अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणीच्यावेळी झालेला युक्तीवादवरुन असे दिसून येते की अपिलार्थी यांनी त्रयस्थ व्यक्तीच्या संदर्भातील माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (ञ)

व शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७.१०.२०१४ विचारात घेता, माहिती देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२०४१ व ४३६८/२०२४ १५६६ दि. ८/8/2025

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ३६ | द्वितीय अपील क्रं. २६०१/२०२४ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भागवत हनुमंतराव देशमुख<br>रा. मु. अंजनपुर पो. आपेगांव ता. अंबजोगाई जि. बीड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी,<br>मंडळ कार्यालय, पाटोदा ता. अंबाजोगाई जि. बीड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, अंबाजोगाई जि. बीड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २६.६.२०२३ | मौ. अंजनपुर येथील स. न. ३६ क ख ग मधील शॉटसर्किटमुळे उस नष्ट झाल्या बाबत कोणी तक्रार दिली |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये व्यक्तीशः माहिती मागविली आहे. मात्र अपिलार्थी माहिती घेण्यासाठी कार्यालयात आले नसल्याने अपिलार्थी यांना माहिती देणे शक्य झाले नाही.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना दिनांक १७.११.२०२३ रोजीच्या आदेशान्वये सुचित केलेले आहे. मात्र सदर आदेशाची अंमजबजावणी झालेली असल्याचे दिसुन येत नाही.

याप्रकरणी अपिलार्थीस माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. ही बाब विचारात घेता अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातुन माहिती अधिकार अधिनियम कलम १९(८)(क) (दोन) नुसार निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, अंबाजोगाई यांना याप्रकरणी आयोगा तर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, अंबाजोगाई जि.बीड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र शा इ

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२६०१/२०२४ 9567 दि. 8|8|2025

<u>प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता</u>

निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ३७ | द्वितीय अपील क्रं. १०७७१/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रीमती भगिरथी निवृत्ती गडदे रा. घन नं. बी-१६ रिजेन्सी गार्डन विटखेडा पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा तलाठी , तलाठी सजा मोरफळी ता. धारुर जि. बीड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, धारुर जि. बीड | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक १३.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. एस. पी. पाखरे व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. श्रीकांत निळे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ३१.१०.२०२४ | श्री. निवृत्ती गडदे यांच्या नावावर सन २०१२ ते २०२४ पर्यंत किती जमिन होती इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरीता आज रोजी सोबत आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना

देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारुन आयोगास असे अवगत केले की, आजरोजी आयोगासमक्ष उपलब्ध करुन दिलेल्या माहिती मध्ये काही माहिती अपुर्ण असल्यास ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडुन नेमकी कोणती माहिती अपुर्ण प्राप्त झाली याबाबत जन माहिती अधिकारी यांना लेखी स्वरुपात कळवावे.अपिलार्थी यांनी सुचित केल्याप्रमाणे त्यांनी अपुर्ण माहिती बाबत कळविल्यास पुढील १५ दिवसात अपिलार्थी यांचा अर्ज विचारात घेऊन उर्वरित माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी या निष्कर्षप्रत येऊन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१०७७१/२०२४ 9968 दि. 8/8/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| **बोर्ड क्रं. ३८ ते ४२** | **द्वितीय अपील क्रं. १०६९२ ते १०६९६/२०२४** |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गणेश अण्णासाहेब येवले<br>रा. डोंगरकिन्ही ता. पाटोदा जि. बीड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार महसुल,<br>तहसिल कार्यालय, पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.२ |

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा तलाठी,<br>तलाठी सज्जा कार्यालय डोंगरकिन्ही ता. पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०५ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अपील क्रं. | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|
| १०६९२/२०२४ | १८.६.२०२४ | जुने अधिकार अभिलेखे मिळणे बाबत |
| १०६९३/२०२४ | १८.६.२०२४ | सर्वे नं. २०३/जी वरील नोंदीबाबतचे सर्व दस्तऐवज मिळणे बाबत. |
| १०६९४/२०२४ | १८.६.२०२४ | सर्वे नं. २०३/जी चा डीजीटल सातबारा वरील नोंदीची माहिती |
| १०६९५/२०२४ | १८.६.२०२४ | डीजीटल सातबारा बाबत |
| १०६९६/२०२४ | १८.६.२०२४ | सर्वे नं. २८२/बी वरील नोंदीबाबत माहिती मिळणे बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी आयोगासमोर कथन केले की, अपील क्रं. १०६९२/२०२४ मध्ये अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करणे विषयी दि. २३.९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. मात्र अपिलार्थी माहितीचे अवलोकन करण्यास कार्यालयात आले नाहीत. याप्रकरणी ज्यानी माहितीचा अर्ज सादर केलेला आहे त्यांना मी ओळखतो. मात्र आज सुनावणीसाठी जे अपिलार्थी म्हणुन उपस्थित आहेत, ते स्वत: अपिलार्थी नसुन दुसरेच व्यक्ती आहे.

जन माहिती अधिकारी तथा तलाठी, डोंगरकिन्ही यांनी आयोगासमोर कथन केले की, उर्वरति सर्व अपील प्रकरणात दिनांक १०.७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना नोदंणीकृत टपालाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवादात असे अवगत केले की, आज सुनावणीसाठी जे अपिलार्थी म्हणुन उपस्थित आहेत, ते स्वत: अपिलार्थी नसुन दुसरेच व्यक्ती आहेत. त्याअनुषंगाने अपिलार्थी म्हणुन उपस्थित असलेल्या व्यक्तीस याबाबत विचारणा केली असता त्यांनी ते आजरोजीच्या सुनावणी करीता अपिलार्थी यांचे प्रतिनिधी म्हणुन उपस्थित असल्याचे आयोगास अवगत केलेले आहे. याअनुषंगाने आयोगापुढील रोजनाम्याचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी त्याचेवतीने संबधित व्यक्तीस प्रतिनिधी म्हणुन उपस्थित राहणे बाबत प्राधिकार पत्र दिले असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे आजरोजी सुनावणी करीता अपिलार्थी म्हणुन उपस्थित व्यक्तीने आज सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष केलेल्या युक्तीवादाची आयोग दखल घेणार नाही. आजरोजी उपस्थित व्यक्तीने कोणताही सारासार विचार न करता किंवा आयोगाची पुर्वपरवानगी न घेता अपिलार्थी म्हणुनच सुनावणी रोजनाम्यावर स्वाक्षरी केली आहे. याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

प्रस्तुत प्रकरणात आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीचे कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्यांचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती व माहिती संदर्भातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

उपरोक्त ०५ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।। ६

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१०६९२ ते १०६९६/२०२४ ९५६९ दि. ८।८।2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४३ | द्वितीय अपील क्रं. १०८३०/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रमेश अण्णाजी घुले रा. साईनगर येरावार ले आऊट छावा किराणा मागे नवीन कृषी उत्पन्न बाजार समिती समोर, यवतमाळ | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १. | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १६.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १०.९.२०२४ | मु. पो. गवळवाडी या गावातील किती लोकांच्या कुणबी प्रमाणपत्राच्या नोंदी सापडल्या आहेत |

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने त्यांना त्यांची बाजु मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊनही ते सुनावणी करिता अनुपस्थित आहेत. यावरुन त्यांना आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही. याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मोघम स्वरुपाची माहिती मागविलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकारणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१०८३०/२०२४ 9470 दि. 8/8/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

| |
|---|
| राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,<br>बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ |

| बोर्ड क्रं. ४४ | द्वितीय अपील क्रं. ९५८४/२०२४ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. महादेव नारायण मानमोडे<br>रा. मु. वहाली पो. सावरगांव (घाट) ता. पाटोदा जि. बीड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २८.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १६.५.२०२४ | सिलींग मध्ये गेलेल्या जमिनीची माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २१.५.२०२४ रोजी पत्रान्वये प्रतिसाद देऊन माहिती संदर्भातील वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना माहिती संदर्भातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./९५८४/२०२४ ९५७। दि. 8|8|2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४५ | द्वितीय अपील क्रं. ९७३६/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जाणु विठोबा पवार<br>रा. शिरुर कासार ता. शिरुर कासार जि. बीड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०५.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २०.८.२०२४ | विठोबा रामकृष्ण पवार यांच्या एकत्र कुंटूबाची जनगणना नक्कल मिळणे बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना दिनांक ०४.११.२०२४ रोजी प्रतिसाद देऊन माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना कळविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना तहसिलदार पाटोदा यांनी माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रकाश

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./९७३६/२०२४ 9571 दि. 13.08.2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ४६ | द्वितीय अपील क्रं. १०५०४/२०२४ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जितेंद्र कान्होजीराव सिरसाट रा. संपादक बीड वास्तव द्वारा हॅप डेली शॉप मागे, अंबिका चौक शाहुनगर कॅनॉल रोड बीड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा जि. बीड | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक २७.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १६.७.२०२४ | शिरुर ते पाटोदा रेल्वे भुसंपादनाच्या अनुषंगाने पंचनामे |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार त्रयस्थपक्षाशी संबंधित माहिती मागविली असल्याचे दिसुन येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (ञ) व शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७.१०.२०१४ विचारात घेता, माहिती देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१०५०४/२०२४ 9572 दि. 13.08.2025

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४७ व ४८ | द्वितीय अपील क्रं. १२१७ व १९३२/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अविनाश अर्जुन पवार<br>रा. नायक नगर भाटवडगाव ता. माजलगाव जि. बीड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार महसुल ,<br>तहसिल कार्यालय, वडवणी जि. बीड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, वडवणी जि. बीड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी (प्रतिनिधी), जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १७.७.२०२३ | बाबी शिवार गट न. १९ फेरफार क्रं. ६०९ चे वाटणी पत्र मिळणे बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली संपुर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती तलाठी सज्जा पुसरा यांचेशी संबधित असल्याने अपिलार्थी यांचा माहिती अर्ज तलाठी पुसरा यांचेकडे हस्तांतरीत केलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी तलाठी, सज्जा पुसरा

यांना दिनांक १२.२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये आदेशित केलेले आहे. त्यानुसार तलाठी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केले आहे. मात्र सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांना अपुर्ण माहिती मिळाली असल्याचे आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी सज्जा पुसरा ता. वडवणी जि. बीड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रिशाइ

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१२१७/२०२४ 9573 दि. 13.08.2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

१. निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
२. तलाठी सज्जा पुसरा ता. वडवणी जि. बीड

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४९ | द्वितीय अपील क्रं. ७७२/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विजयसिंग शिवसिंग ठाकुर<br>रा. सुंदरनगर पडेगाव, छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,<br>ग्राम पंचायत फतियाबाद<br>ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती, गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २३.१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| | शिवसिंग छगन ठाकूर यांच्या नावे ग्राम पंचायत हद्दीत असलेली मिळकतचा नमुना नं.८ |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय, फतियाबाद ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्व सुचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थितीत असल्याने त्यांचे विरुध्द सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/ प्र.क्र.(२२२/१५) सहा.मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कारवाई करावी.

३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७७२/२०२४ 9579 दि. 13.08.2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ५० | द्वितीय अपील क्रं. १८९५/२०२४ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विजय गोपीनाथ मुगदल<br>रा. चित्ते पिंपळगाव ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी,<br>ग्राम पंचायत पिंप्री खुर्द ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १३.५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २८.२.२०२५ | ग्राम पंचायतचे घर नोंदणी व फेरफार बाबतचे रेकॉर्ड मिळणे बाबत. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २५.४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार

आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या आदेशाची अमंलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत पिंप्री खुर्द ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१८९५/२०२४ 9575 दि. 13.08.2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५१ व ५२ | द्वितीय अपील क्रं. ६०६५ व ७१३०/ २०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गजानन कानडे<br>रा. हनुमान मंदिराजवळ श्रीनगर ता. जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ, वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ, वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक १८.९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २.६.२०२३ | दि. २०.४.२०२३ रोजी सहायक प्राध्यापक पदाच्या नियुक्ती संदर्भात |
| २.८.२०२३ | सन २०१५-२०२३ या कालावधीत विद्यालयात भरती केलेल्या प्राध्यापक/शिक्षक यांच्या नियुक्तीच्या जाहीर प्रगटन इत्यादी |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ, वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी

यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (वैयक्तीक माहिती वगळुन) अपिलार्थीस कलम ७(६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह ०२ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६०६५/२०२३ 9576 दि. 13/8/2025

<u>प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता</u>

विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ५३ | द्वितीय अपील क्रं. ६०६२/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गजानन कानडे<br>रा. हनुमान मंदिराजवळ श्रीनगर ता. जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकिय आरोग्य अधिकारी,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १८.९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. डॉ. प्रतिमा ग. कदम, जन माहिती अधिकारी व डॉ. हनुमंत रिठे, प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०१.६.२०२३ | मुस्तेताब व इतर यांचे जन्मप्रमाणपत्राच्या संपुर्ण संचिकेची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाच्या जन्म प्रमाणपत्राच्या संचिकेची मागणी केलेली आहे. मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाची असल्याने कलम ८ (त्र) नुसार अपिलार्थी यांना दि. २०.६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती नाकारली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील अमान्य केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक ११.८.२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६०६२/२०२३ 9577 दि. 13/8/2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता
आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ५४ | द्वितीय अपील क्रं. ४८९५/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गजानन कानडे<br>रा. हनुमान मंदिराजवळ श्रीनगर ता. जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (साप्रवि),<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन),<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. श्री. पदमाकर कावळे, कार्यालय अधिक्षक जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व श्रीमती सुप्रिया टवलारे, प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०१.६.२०२३ | मालमत्ता व्यवस्थापक यांच्या संपुर्ण मुळ संचिकेची प्रत इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाच्या मुळ संचिकेची मागणी केलेली आहे. मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाची असल्याने कलम ८ (त्र) नुसार अपिलार्थी यांना दि. १३.६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती नाकारली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. १८.७.२०२३ सुनावणी

घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील अमान्य केलेले आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही त्रयस्थपक्षाशी संबधित आहे. मात्र नियुक्ती व पदोन्ती आदेश व लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र माहिती वैयक्तीक स्वरुपाची किंवा अशी माहिती प्रकट करण्यास अपवाद ठरविलेली असल्याचे दिसुन येत नाही. तसेच सदर माहिती प्रकट केल्यामुळे त्रयस्थपक्षाच्या खाजगी बाबीमध्ये कोणताही अंगतुक हस्तक्षेप होईल अशी देखील शक्यता याठिकाणी दिसुन येत नाही. सदरची माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणातील कार्यालयीन कामकाजाशी निगडित असल्याच्या निष्कर्षप्रत आयोग येऊन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. २१.०७.२०२३ रोजी पारित केलेला निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (साप्रवि), नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांना केवळ श्री. गुलाम मो. सादिक, मालमत्ता व्यवस्थापक यांच्या नियुक्ती व पदोन्तीचे आदेश व लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र कलम ७(६) नुसार विनामूल्य नोंदणीकृत टपालाने उपलब्ध करुन द्यावे.

२. उपआयुक्त प्रशासन नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४८९५/२०२३ 9578 दि. 13/8/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५५ | द्वितीय अपील क्रं. ७७९९/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गजानन कानडे<br>रा. हनुमान मंदिराजवळ श्रीनगर ता. जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,<br>उप वनसंरक्षक वनविभाग नांदेड यांचे कार्यालय | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव)<br>सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) नांदेड यांचे कार्यालय | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. श्री. एस. जे. देसाई, जन माहिती अधिकारी व श्री. श्रीकांत, प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १४.९.२०२३ | नांदेड जिल्हयाची लेखापरीक्षण केलेल्याची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन नेमकी कोणती माहिती पाहिजे हे अर्जाच्या विषयावरुन स्पष्ट होत नसल्याने अपिलार्थी यांचा माहिती अर्ज दिनांक १३.६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये निकाली काढला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. २०.११.२०२३ सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील अमान्य केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक ३०.११.२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७७९९/२०२३ 9579 दि. 13|8|2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ५६ | द्वितीय अपील क्रं. ७४०/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अर्शद खान अहेमद खान<br>रा. मिल गेट रोड नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा अग्निशमन अधिकारी,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ३०.१.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. केरोजी एस. दासरे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०२.८.२०२२ | २८.३.२०२२ ते आजपर्यंतची अग्निशमन विभागाकडून देण्यात आलेल्या नाहरकत प्रमाणपत्राची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक १८.१०.२०२२ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन कोणाच्या बाबतीत माहितीची आवश्यकता आहे, याबाबत अपिलार्थी यांनी स्वतंत्र स्वंयस्पष्ट अर्ज केल्यास त्यांना नियमाप्रमाणे माहिती देण्यात येईल असे नमदु करुन अपील निकाली काढलेले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती हवी याबाबत स्पष्ट उल्लेख करुन स्वतंत्र अर्ज दाखल केल्यास माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होईल असे अपिलार्थी यांना दिनांक २८.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांनी कार्यालयात उपस्थित राहुन आवश्यक नेमक्या अभिलेखाची पाहणी करुन त्यांना हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेतलेली आहे. याबाबत अपिलार्थी यांनी दि. १७.७.२०२५ रोजी तसे लेखी निवेदन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिलो असता त्यांनी हवी असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे मला आश्वासित करुन तशी माहिती मिळाल्याबाबतची पोच माहितीचे प्रदान करण्यापुर्वीच घेतलेली आहे. मात्र त्यांनी आश्वासित केल्याप्रमाणे तसेच माहिती मिळाल्याची पोच घेऊन हवी असलेली माहिती त्यांनी अदयाप उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणुन हवी असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे त्यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही असे नमुद केलेले आहे. तसेच आज सुनावणी दरम्यान अपीलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अग्निशमन अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन माहितीचे अवलोकन द्यावे. सदर अवलोकनाच्यावेळी नेमुकी कोणती माहिती हवी आहे, याबाबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना अवगत करावे.अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. उपआयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७४०/२०२३ 9580 दि. 13/8/2025

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

| |
|---|
| राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,<br>बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ |

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५७ | द्वितीय अपील क्रं. ६२१/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विजय नारायण शेळके,<br>रा. समर्थ रेसिडन्सी सोमेश कॉलनी, नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अधिकारी, क्षेत्रिय कार्यालय क्रं. ४<br>वजिराबाद नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त -म<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २५.१.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गौतम कवडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०१.४.२०२२ | मनपा नं. २-९-१९१ या इमारतीचे साईट इन्स्पेकशन |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरीता आज रोजी सोबत आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६२१/२०२३ 9581 दि. 13/8/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५८ | द्वितीय अपील क्रं. ९६७/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. लक्ष्मण पिराजी कांबळे रा. रेणुका नगर प्लॉट नं. २४७ सर्वे नं. ५० गारखेडा, छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त साप्रवि, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त प्रशासन, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक ०६.२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पदमाकर कावळे कार्यालय अधीक्षक व प्रथम अपिलीय अधिकारी श्रीमती सुप्रिया टवलारे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १२.१२.२०२२ | गुलाम मोहमद सादीक यांच्या नेमणुकीच्या फाईल मधील कागदपत्राची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ५.४.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे अपील अशंत: मंजुर करुन खाजगी बाबीशी आगंतुक हस्तक्षेप करील अशी माहिती वगळुन अपिलार्थी यांनी मागितलेली इतर माहिती विनामुल्य देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहे. मात्र त्यांनी दिनांक १८.७.२०२५ रोजी आयोगात लेखी निवेदन देऊन त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही असे कळविले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अमंलबजावणी केली असल्याच दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त साप्रवि, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. उपआयुक्त प्रशासन, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./९६७/२०२३ 9582 दि. 13/8/2025

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५९ | द्वितीय अपील क्रं. १०८५/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहम्मद फहीम मोहम्मद अ. रशीद<br>रा. गाडीपुरा बडी दर्गाह नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता बांधकाम,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बांधकाम,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १०.२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. अरुण शिंदे व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. टाकळीकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २६.९.२०२२ | नांदेड महानगरपालिका विविध विभागामार्फत देण्यात आलेल्या देखभाल दुरस्तीची यादी ठेकेदाराच्या तपशीलासह |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असुन अपिलार्थी यांनी दि. ८.७.२०२५ रोजीच्या निवेदनाद्वारे माहिती मिळाली असल्याने अपील निकाली काढणे बाबत विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१०८५/२०२३ 9583 दि. 13/8/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ६० | द्वितीय अपील क्रं. १०९१/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सखाराम रघुनाथराव कुलकर्णी<br>रा. मु. पो. ब्राम्हण गल्ली मंठा जि. जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक आयुक्त,क्षेत्रीय कार्यालय क्रं. २,<br>अशोकनगर नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दिनांक १०.२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. राजेश जाधव उपस्थित आहेत.
अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०७.९.२०२२ | अशोकनगर नांदेड येथील किर्ती अपार्टमेन्टच्या नियमबाहय बांधकामाची चौकशी बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४.११.२०२२ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी आयोगात सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनामध्ये मागणी केल्यानुसार माहिती दिली नाही असे नमुद केलेले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अमंलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

# आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, क्षेत्रीय कार्यालय क्रं. २, अशोकनगर नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७(६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. उपआयुक्त महसुल, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१०९१/२०२३ ९५७२ दि. ४/८/२०२५

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६१ | द्वितीय अपील क्रं. १३२२/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संभाजी माधवराव कास्टेवाड<br>रा. बसवेश्वर तरोडा खु. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त आस्थापना,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दिनांक २३.२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पदमाकर कावळे व प्रथम अपिलीय अधिकारी श्रीमती सुप्रिया टवलारे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १३.१०.२०२२ | पदोन्ती बाबत दि. ९.११.२०१२ ते ३१.१२.२०१६ पर्यत इतिवृत्त |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १०.११.२०२२ रोजी उत्तर देऊन वैयक्तीक स्वरुपाची माहिती असल्याने माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. २७.१२.२०२२ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती

उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. त्यानुसार दिनांक १७.१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१३२२/२०२३ 9473 दि. 8/8/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ६२ | द्वितीय अपील क्रं. १४९०/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहम्मद ईशाद मो. इलियास<br>रा. रहेमतनगर नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा उद्यान अधीक्षक,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक १.३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. मिर्झा फरहतउल्ला बेग उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १५.११.२०२२ | दि. ४.११.२०२२ रोजी दिलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही केली आहे. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये व्यक्तीश: माहितीची मागणी केलेली असल्याने अपिलार्थी यांना भ्रमण दुरध्वनीवर माहिती घेऊन जाणेकरिता संपर्क साधला असता अपिलार्थी यांनी कसलाही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीमागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरीता आजरोजी सोबत आणलेली आहे.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, या प्रकरणी अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने त्यांना त्यांची बाजु मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊनही ते सुनावणी करिता अनुपस्थित आहेत. यावरुन त्यांना माहिती मिळविण्यामध्ये तसेच आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१४९०/२०२३ 9574 दि. 8/8/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६३ | द्वितीय अपील क्रं. १८४७/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मो. साबेर मोहम्मद हसन<br>रा. घर क्रं. ७-३-३०५ मॅप्को कंपनी बाजुस साईनगर नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त आस्थापना,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त प्रशासन,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १३.३.२०२३रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी ॲड. गोविंद कारवा, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पदमाकर कावळे, कार्यालय अधीक्षक व प्रथम अपिलीय अधिकारी श्रीमती सुप्रिया टवलारे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १२.१२.२०२२ | सन १९९५ ते २०१५ पर्यत अनुकंपा तत्वावर नियुक्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांची नियुक्ती आदेशाच्या प्रती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना कलम ८(त्र) अन्वये माहिती नाकारण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २०.३.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक असलेली माहिती अद्याप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नसल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त आस्थापना, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त आस्थापना, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच <u>दिनांक १५.९.२०२५</u> रोजी द्वितीय अपील क्रं. व सुनावणी दिनांकाचा संदर्भ नमुद करुन <u>आयोगासमोर व्यक्तीशः</u> उपस्थित राहून सादर करावा.तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१८४७/२०२३ 9475 दि. 8/8/2025 <u>नोंदणीकृत टपालाने</u>

<u>प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता</u>
आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६४ | द्वितीय अपील क्रं. १८७७/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अब्दुल खय्युम खान , जिल्हा महासचिव राष्ट्रीय लोकजनशक्ती पार्टी कार्यालय, गोवर्धन घाट ब्रिजजवळ नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (आस्थापना) नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त आस्थापना, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १३.३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पदमाकर कावळे, कार्यालय अधीक्षक व प्रथम अपिलीय अधिकारी श्रीमती सुप्रिया टवलारे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०७.१२.२०२२ | दि. १.१.१९९१ ते ३१.१२.२०२१ पर्यत चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना खुल्या वर्गातुन तृतीयश्रेणी वर्गात देण्यात आलेल्या पदोन्नतीची यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दिनांक १२.१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना माहिती नाकरलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २०.३.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी

आदेशित केलेले आहे. त्यानुसार १९.४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असुन अपिलार्थी यांनी तशी पोच दिलेली असल्याने अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी आयोगासमोर झालेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१८७७/२०२३ 9576 दि. 8/8/2025

सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ६५ | द्वितीय अपील क्रं. २०३४/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रामनारायण मयाराजी बंग<br>रा. घर नं. १६ नारायणी मेनरोड यशवंतनगर , नांदेड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १. | जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायकसंचालक, नगर रचना,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २३.३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. म. दा. पवार व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. प्र. ला. आलुरकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २४.११.२०२२ | अधिकाऱ्यावर प्रस्तावित असलेल्या कार्यवाहीची माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २६.१२.२०२२ रोजी उत्तर देऊन आपला अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. २४.२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिलेली माहिती योग्य वाटते असे नमुद करुन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक ८.३.२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२०३४/२०२३ 9477 दि. 8/8/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

| |
|---|
| राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,<br>बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ |

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६६ | द्वितीय अपील क्रं. २४८२/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख अब्दुल्ला शेख छोटे मियाँ<br>रा. मच्छली मार्केट, इतवारा बाजर नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिंती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी झोन का. क्रं. ३<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १७.४.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.जी. जी. तोटावार प्र. कार्यालय अधीक्षक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १४.११.२०२२ | तक्रारीवर काय कार्यवाही करण्यात आली. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २८.३.२०२३ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.५.२०२३ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक १२.५.२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रइं.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२४८२/२०२३ 9478 दि. 8/8/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ६७ | द्वितीय अपील क्रं. २९९०/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख रियाज शेख अय्युब<br>रा. मगदुमनगर गल्ली नं. १ नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,क्षेत्रीय कार्यालय क्रं. ३ शिवाजीनगर, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त-३,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.५.२०२३रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. राजेश कऱ्हाळे, कार्यालय अधीक्षक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २३.१२.२०२२ | माझे नांव परिवर्तन करण्यात आलेल्या संचिकेची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. १३.४.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

आजरोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी आयोगात सादर केलेल्या द्वितीय अपीलाच्या प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही असे नमुद केलेले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अमंलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, क्षेत्रीय कार्यालय क्रं. ३ शिवाजीनगर, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. उपआयुक्त-३, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२९९०/२०२३ 9479 दि. 8|8|2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६८ व ६९ | द्वितीय अपील क्रं. ३६५६ व ३६५७/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रावसाहेब पुरभाजी सरोदे<br>रा. काबरानगर, नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक ०७.६.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. म. दा. पवार व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. प. ला. आलुरकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ११.१.२०२३ | विष्णुनगर नांदेड सिटीएसनं. ११०३८ सर्व्हे नं. ६४ वजिराबाद येथील माहिती व श्री. भार्गव, पाटनुरकर, संतुकसिंह यांना निर्गमित केलेले बांधकामाची परवानगी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २.२.२०२३ रोजी प्रतिसाद देऊन अभिलेखात माहिती आढळुन आली नाही. तरी बांधकाम परवानाचे वर्ष व संचिका नंबर दिल्यास माहिती शोधून देण्यात येईल असे अपिलार्थी यांना कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.३.२०२३ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक २१.३.२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

उपरोक्त ०२ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

प्रि२ाइ

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./३६५६/२०२३ 9480 दि. 8/8/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७० | द्वितीय अपील क्रं. ३९०७/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अहेमद पाशा अब्दुल सलीम देसाई<br>रा. खय्युम कॉम्पलेक्स देगलूर नाका नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक नगररचना,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १५.६.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. म. दा. पवार व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. प. ला. आलुरकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०५.९.२०२२ | सन्मान प्रेस्टीज नांदेड येथील जलतारिणीकेला देण्यात आलेल्या परवानगीची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती मुदतीत न दिल्याने विनाशुल्क देणे अपेक्षित होते मात्र शुल्क भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे. तरी भरणा केलेले माहितीचे शुल्क परत करणे बाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देश द्यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाची माहिती मागविली असल्याने त्रयस्थपक्षाला माहिती देण्या संदर्भात काही हरकत आहे किंवा कसे याबाबत दिनांक १४.९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये विचारणा करण्यात आलेली

आहे. मात्र त्रयस्थ पक्षाकडुन काहीच प्रतिसाद न आल्याने माहितीचे अवलोकन करणे विषयी अपिलार्थी यांना दिनांक ७.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सुचित करण्यात आले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांनी दिनांक २८.१०.२०२२ रोजी कार्यालयात येऊन माहितीचे अवलोकन केल्यानंतर त्यांनी चिन्हांकित केलेल्या माहितीचे रुपये ७०२/- भरणा करणे विषयी अपिलार्थी यांना दि. ३१.१०.२०२२ रोजी कळविले आहे. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर दिनांक ०६.१२.२०२३ रोजी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

तथापी अपिलार्थी यांनी माहिती देण्याची ३० दिवसाची मुदत होण्यापुर्वीच दिनांक २०.९.२०२२ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २८.१२.२०२२ रोजी सुनावणी घेऊन माहिती अधिकारी यांनी केलेली कृती योग्य ठरते अपिलार्थी यांना इमारतीचा बांधकाम परवाना व आवश्यक तेथे झाकून नकाशाची प्रत पुरवावी असे नमुद करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक ०२.१.२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रि शाडु

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./३९०७/२०२३ ९५८। दि. ८|८|२०२५

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ७१ | द्वितीय अपील क्रं. ४०३७/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख महेमुद शेख मौला रा. सैलानी दर्गा, सरकारी दवाखान्याजवळ, जवाहारनगर तुप्पा ता. जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, क्षेत्रिय कार्यालय-२ अशोकनगर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. राजेश जाधव उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २५.४.२०२३ | मालमत्ता आकारणीची नोटीस मिळणे बाबत. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये व्यक्तीश: माहितीची मागणी केली असल्याने माहिती घेऊन जाणेसाठी अपिलार्थी यांना दुरध्वनीद्वारे संपर्क साधला असता त्यांचा संपर्क झालेला नाही. तसेच अपिलार्थी माहिती घेण्यासाठी कार्यालयात आलेले नसल्याने अपिलार्थी यांना माहिती देणे शक्य झालेले नाही.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने त्यांना त्यांची बाजु मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊनही ते सुनावणी करिता अनुपस्थित आहेत. यावरुन त्यांना माहिती मिळविण्यामध्ये तसेच आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रिशाडू

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४०३७/२०२३ 9584 दि. 13/8/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ७२ व ७३ | द्वितीय अपील क्रं. ४३८४ व ४३८५/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विजय नारायण शेळके, रा. ओकांर पॅथोलॉजी लॅब, बरारा टॉवर डॉक्टर्स लेन, कालामंदिर समोर नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा नगर रचना विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक नगररचना, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. म. दा. पवार व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. प. ला. आलुरकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ३०.१.२०२३ | दि. ३०.१२.२०२१ या पत्राची व यासंबधित पत्रव्यवहारांच्या कागदपत्रांची प्रती मिळणे. |
| २५.१.२०२३ | सोमेश कॉलनी वजिराबाद स्थित समर्थ रेसिडेंसी नं. २-९-१९९ अनाधिकृत बांधकाम बाबत. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपील क्रं. ४३८५/२०२३ मधील विषय क्षेत्रीय कार्यालय क्रं. ४ यांचेशी संबधित असल्याने माहितीचा अर्ज संबंधित कार्यालयाकडे दिनांक १३.३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये हस्तांतरीत केलेला आहे. अपील क्रं. ४३८४/२०२३ प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. १४.९.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश दिलेले

आहेत. त्यानुसार कार्यालयातील जावक नोंदवहीची पडताळणी केली असता माहिती अर्जात नमुद करण्यात आलेले पत्र दिसुन आलेले नसल्याचे अपिलार्थी यांना दिनांक ०७.६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती व माहिती संदर्भातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०२ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४३८४ व ४३८५/२०२३ 9482 दि. 8/8/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७४ | द्वितीय अपील क्रं. ४५३८/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जगदिप सिंध मोहन सिंघ नबरदार, रा. बडपुरा भगतसिंग रोड, नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ११.७.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३)अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. अरुण शिंदे व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. दिलीप टाकळीकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ३१.३.२०२३ | प्रभाग क्रं. १७ मध्ये गुरुद्वारा गेट नं. २ यात्री निवास ते काटगर यांच्या घरापर्यंत सीसी रस्ता बनविण्यापुर्वी किती होता इत्यादी. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती दि. १८.७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना समक्ष उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४५३८/२०२३ 9483 दि. 8/8/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ७५ व ७६ | द्वितीय अपील क्रं. ४८६५ व ४८६६/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जावेद खान मोहियोदिन<br>रा. पाणी टाकी समोर, देगलूर नाका, नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्यलेखाधिकारी,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.८.२०२३रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३)अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.सतपालसिंघ कोल्हापुरे व प्रथम अपिलीय अधिकारी श्रीमतीसुजाता वाडियार उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ३.५.२०२३ व १०.५.२०२३ | श्री. भालचंद्र मसलेकर, लिपीक यांनी २००८ पासुन आजपर्यंत उचलेले वेतनाची प्रत हजेरी पत्रक, सध्या कार्यरत ठिकाण मुळ पद कुठे आहे इत्याद |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी नाकारली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाची वैयक्तीक माहिती मागविली असल्याने अपिलार्थी यांना माहिती नाकरण्यात आलेली असुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी श्री. भालचंद्र मसलेकर हे कार्यालयात कार्यरत नसतानाही वेतन घेऊन महानगरपालिकेची फसवुणक करीत असल्यामुळे माहितीची मागणी केली असल्याचे आयोगास अवगत केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना माहिती देण्यात आली नाही असे नमुद केलेले आहे. तसेच आज सुनावणी दरम्यान माहिती मिळाली नसल्याचे आयोगास अवगत करुन संबधित त्रयस्थ कर्मचारी महानगर पालिकेमध्ये कार्यरत नसताना वेतन घेऊन फसवणुक करत असल्याचे अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केलेले आहे. याप्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी मागणी केलेली बहुतांश माहिती ही त्रयस्थपक्षाशी संबधित आहे. मात्र अपिलार्थी यांनी आजरोजी युक्तीवादात अवगत केलेल्या बाबीच्या अनुषंगाने अपिलार्थीस श्री. भालचंद्र मसलेकर, लिपीक यांना अदा केलेल्या एक वर्ष कालावधीचे (सन २०२४-२०२५) केवळ देय होणारे वेतन (कपाती वगळुन) व श्री. भालचंद्र मसलेकर, लिपीक यांच्या प्रथम नियुक्ती आदेशाची प्रत अशी माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक ठरेल या निष्कर्षप्रत आयोग येत आहे व अशी अनुज्ञेय होणारी माहिती अपिलार्थीस प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातुन माहिती अधिकार अधिनियम कलम १९ (८) (क) (दोन) नुसार उपआयुक्त प्रशासन, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांना याप्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. आयोगा तर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त प्रशासन, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद माहितीच्या अनुषंगाने वर नमुद केल्याप्रमाणे माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, अपिलार्थी यांना कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.
२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४८६५ व ४८६६/२०२३ 9585 दि. 13/8/2025
प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

१. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड
२. उपआयुक्त प्रशासन, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ७७ | द्वितीय अपील क्रं. ६६९६/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भगवान माधवराव वटेमोड रा. पितृकृपा भवन पुरुषोत्तम नगर पो. सिडको माधवराव वटेमोड विद्यालय जवळ कौठा नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक नगररचना, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १२.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. म. दा. पवार व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. प्र. ला. आलुरकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १७.७.२०२३ | मौ. कोठा पैकी भाग नकाशा इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २०.७.२०२३ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना माहिती अर्जातील मुद्या क्रं. १,३, ४ व ५ वरील मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने त्याबाबत कथन करता येत नाही. व मुद्या क्रं. २ संदर्भात माहितीचे शुल्क रुपये ७००/- भरणा करणे विषयी कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक १.८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. तसेच अपिलार्थी यांना भाग नकाशा व शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर झालेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६६९६/२०२३ 9584 दि. 8/8/2025

सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७८ | द्वितीय अपील क्रं. ६८४१/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विजय नारायण शेळके, रा. प्लॉट नं. ३०३ समर्थ रेसिडन्सी, सामेश कॉलनी कलामंदिर मागे, नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, क्षेत्रिय कार्यालय क्रं. ४ वजिराबाद नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (म.), नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ११.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. गौतम कवडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २५.१.२०२३ | सोमेश कॉलनी वजिराबाद स्थित समर्थ रेसिडन्सी (मनपा नं. २-९-१९९) या इमारतीच्या अनाधिकृत बांधकामा बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक १३.७.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र सदर आदेशाची अमंलबजावणी झालेली असल्याचे दिसुन येत नाही. याप्रकरणी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले असल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहितीचे अधिनियमाचे कलम २(J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तीक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, क्षेत्रिय कार्यालय क्रं. ४ वजिराबाद नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन माहितीचे अवलोकन द्यावे.अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली व नियमानुसार देय असलेली माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप आयुक्त (म.), नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६८४१/२०२३ ९५८५ दि. 8/8/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७९ | द्वितीय अपील क्रं. ७६८६/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जसपाल सिंघ ग्यान सिंघ लांगरी<br>रा. गुरद्वारा गेट नं. १ नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार,<br>नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक नगररचना,<br>नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ३०.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. म. दा. पवार व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. प. ला. आलुरकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०३.४.२०२३ | महापालिके तर्फे विना बांधकाम परवाना दुरुस्ती करण्यासाठी मुभा देण्यात आली होती त्या ठरावाची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ०४.१०.२०२३ रोजी सुनावणी घेऊन माहिती अर्ज क्षेत्रीय कार्यालय क्रं. ४ यांचेकडील आहे. त्यामुळे सदर अपील त्याचे अपिलीय अधिकारी यांचेकडे होणे आवश्यक होते. सदर अपील कार्यकक्षे बाहेरील असल्यामुळे फेटाळण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांच्या दि. ०३.४.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. ४ महानगरपालिका नांदेड यांचेकडे माहिती अर्ज सादर केलेला आहे. याच विषयाचा माहिती अर्ज अपिलार्थी यांनी पुनश्च दि. १०.१०.२०२३

सहायक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. ४ यांचेकडे सादर केला आहे. सदर माहिती अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९.११.२०२३ रोजी प्रतिसाद देऊन मागणी केलेली माहिती नगररचना विभागाशी संबंधित असल्यामुळे वेगळा अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळवुन माहिती अर्ज निकाली काढलेला आहे.

माहिती दुसऱ्या कार्यालय/विभागाशी संबंधित असल्यास अशा माहिती करिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त ५ दिवसाच्या आत माहितीशी संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. मात्र याप्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज संबंधित विभागाकडे मुदतीत हस्तांतरीत न करता माहिती अर्ज निकाली काढलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे मुदतीत हस्तांतरण झाले नसल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. ४ महानगरपालिका नांदेड यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती संबधित विभागाकडुन संकलित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी या निष्कर्षप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. ४, नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती संबंधित कार्यालयाकडुन अधिनियमातील कलम ५(४) नुसार संकलित करुन अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. उपआयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

५।२।२३

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७६८६/२०२३ 9486 दि. 8/8/2025

<u>प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता</u>

१. सहायक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. ४, नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड
२. उप आयुक्त, नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ८० | द्वितीय अपील क्रं. ८३७७/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अरबाज अमशान अब्बु अमशान<br>रा. अरब गल्ली जवळ, दरबार मस्जीद नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, क्षेत्रिय कार्यालय क्रं. ४ वजिराबाद, नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त-३, नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २९.१२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.सदर सुनावणीच्या अनुषगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री: गौतम कवडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २६.७.२०२३ | चौकशी करुन कोणत्या प्रकाराची कार्यवाही केली असेल तर त्या कार्यवाहीच्या प्रती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी नाकारली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १६.१०.२०२३ रोजी उत्तर देऊन त्रयस्थपक्षाची माहिती असल्याने माहिती नाकारण्यात येत आहे, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. १७.१०.२०२३ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणीच्यावेळी झालेला युक्तीवाद व आयोगासमोर असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की अपिलार्थी यांनी त्रयस्थ व्यक्तीच्या संदर्भातील वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (ञ) व शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७.१०.२०१४ विचारात घेता, माहिती देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./८३७७/२०२३ ९५९१ दि. ४।८।२०२५

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ८१ ते ८९ | द्वितीय अपील क्रं. ८२८४ ते ८२८९/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मधुकर सुदाम मुनेश्वर<br>द्वारा स्नेहा किरणा शिवशंकर नगर गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक परिक्षेत्र मांडवी जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा) शिवाजीचौक रेंज वनवसाहत जुने नगरपालिका जवळ किनवट जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २७.१२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०९ द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अपील क्रं. | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|
| ८२८४/२०२३ | २८.६.२०२३ | शासकीय वाहनावर झालेल्या खर्चाची माहिती व प्रमाणकांच्या प्रती |
| ८२८५/२०२३ | २८.६.२०२३ | विविध योजना अंतर्गत मंजुर कामे, शिल्लक निधी व कामाची स्थिती |
| ८२८६/२०२३ | २८.६.२०२३ | शासकीय वनात झालेल्या अवैध वृक्षतोडीची माहिती |
| ८२८७/२०२३ | २८.६.२०२३ | पुरवठा केलेल्या रोपांची संख्या, लावलेल्या रोपाचे छायाचित्र |
| ८२८८/२०२३ | २८.६.२०२३ | वनक्षेत्राच्या राखीव व संरक्षीत वनात लागलेल्या आगीची माहिती |
| ८२८९/२०२३ | २८.६.२०२३ | वनजमिनीवरील अवैधरित्या झालेल्या अतिक्रमणाची माहिती |
| ८२९०/२०२३ | २८.६.२०२३ | वनपरिक्षेत्रात कार्यरत सर्व कर्मचाऱ्याच्या रोजनिशी, दौरा तपशील इ. |
| ८२९१/२०२३ | २८.६.२०२३ | वनविकास यंत्रणा समितीस प्राप्त निधी कामचा तपशील व खर्च |
| ८२९२/२०२३ | २८.६.२०२३ | वन कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, कार्यरत दिनांक व ठिकाण |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलर्थी यांच्या ०९ प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.९.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्रकट केल्यामुळे नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते, याबाबत अपिलार्थी यांना सुनावणी दरम्यान विचारणा केली असता याबाबत अपिलार्थी कोणतेही समाधानकारक उत्तर आयोगास देऊ शकले नाहीत. तसेच याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये काहीही नमुद केलेले नाही.

याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मोघमपणे विस्तृत स्वरुपाची मोठया कालावधीची माहिती मागविलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/ संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही. तसेच मागणी केलेल्या माहितीमध्ये आयोगास कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नाही. याप्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय पारित करताना अशा बाबी विचारात घेतल्या असल्याचे दिसुन येत नाही. सबब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ३०.९.२०२३ रोजी पारित केलेले निर्णय अधिक्रमित करुन आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०९ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./८२८४/२०२३ 9586 दि. 13/2/2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता
उपवनसंरक्षक वनविभाग किनवट जि. नांदेड

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ९० ते ९३ | द्वितीय अपील क्रं. ५१७० ते ५१७३/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रदिप पाटील हुंबाड<br>रा. नंदनवन पो. मंगलसांगवी ता. कांधार जि. नांदेड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १. | जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,<br>वनविभाग, गांधी पुतळयाजवळ पाठीमागे, चिखलवाडी कॉर्नर नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, (रोहयो व वन्यजीव) गांधी पुतळयाच्या पाठीमागे चिखलवाडी कॉर्नर नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १४.८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०४ द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी श्री. एस. जे. देसाई व प्रथम अपिलीय अधिकारी श्री.श्रीकांत इरलोड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अपील क्रं. | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|
| ५१७०/२०२३ | २३.५.२०२३ | वनपरिक्षेत्र अधिकारी किनवट यांच्या कार्यालया अंतर्गत १ मार्च २०२२ ते १५ मार्च २०२३ पर्यत कालावधीच्या फॉर्म न. ३५ ची प्रत |
| ५१७१/२०२३ | २३.५.२०२३ | वनपरिक्षेत्र अधिकारी मांडवी यांच्या कार्यालया अंतर्गत १ मार्च २०२२ ते १५ मार्च २०२३ पर्यत कालावधीच्या फॉर्म न. ३५ ची प्रत |
| ५१७२/२०२३ | २३.५.२०२३ | वनपरिक्षेत्र अधिकारी मांडवी यांच्या कार्यालया अंतर्गत १ मार्च २०२२ ते १५ मार्च २०२३ पर्यत कालावधीच्या फॉर्म न. ३२ ची प्रत |
| ५१७३/२०२३ | २३.५.२०२३ | वनपरिक्षेत्र अधिकारी किनवट यांच्या कार्यालया अंतर्गत १ मार्च २०२२ ते १५ मार्च २०२३ पर्यत कालावधीच्या फॉर्म न. २५ ची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी दि. १८.७.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत अशी विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी किनवट व मांडवी यांचे कार्यालयाशी संबधित असल्याने अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरीत केलेला आहे. अपिलार्थी यांनी मोघपणे विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्रकट केल्यामुळे नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते, याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये काहीही नमुद केलेले नाही.

याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मोघमपणे विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/ संकलित करण्या करिता सार्वजनिक प्राधिकारणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही. तसेच मागणी केलेल्या माहितीमध्ये आयोगास कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नाही. याप्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय पारित करताना अशा बाबी विचारात घेतल्या असल्याचे दिसुन येत नाही. सबब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक १९.७.२०२३ रोजी पारित केलेले निर्णय अधिक्रमित करुन आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०४ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

प्र. शा. इं.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./५१७० ते ५१७३/२०२३ 9487 दि. 8/8/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ९४ | द्वितीय अपील क्रं. ६१३२/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जोंधळे शेषराव माधवराव<br>रा. बापशेटवाडी पो. बारहाळी ता. मुखेड जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक, परिक्षेत्र मुखेड जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा) वनविभाग गांधी पुतळयाच्या मागे, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २२.९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. उल्हास चव्हाण व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. भारत खोलबांडे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०२.२.२०२३ | येवती, तारदवाडी येथील रोपवन कामाच्या ३२ नं. व्हाऊचरचे माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ३.३.२०२३ रोजी प्रतिसाद देऊन माहितीचे अवलोकन करणे विषयी अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २३.६.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन देणे विषयी आदेशित केलेले आहे. मात्र अपिलार्थी माहितीचे अवलोकन करण्यास कार्यालयात आले नसल्याने अपिलार्थी यांना माहिती देणे शक्य झालेले नाही.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, या प्रकरणी अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने त्यांना त्यांची बाजु मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊनही ते सुनावणी करिता अनुपस्थित आहेत. यावरुन त्यांना माहिती मिळविण्यामध्ये तसेच आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६१३२/२०२३ 9587 दि. 13/8/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

| |
|---|
| राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,<br>बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ |

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ९५ | द्वितीय अपील क्रं. ६४७३/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शिवाजी सटवाजी चव्हाण<br>रा. मु. पो. वडगाव ता. हदगाव जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक,<br>परिक्षेत्र हदगांव जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा)<br>वनविभाग गांधी पुतळयाच्या मागे, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०५.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.उल्हास चव्हाण व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. भारत खोलबांडे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १९.४.२०२३ | सन २०१७ ते २०२३ या कालावधीमध्ये विविध योजने अंतर्गत वृक्ष लागवड संरक्षण व संगोपन याकरिता किती निधी उचलला इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मोघमपणे विस्तृत स्वरुपाची माहिती मागविली असल्याने अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करणे विषयी दिनांक १७.५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. मात्र अपिलार्थी माहितीचे अवलोकन करण्यास आले नाहीत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २३.६.२०२३ रोजी सुनावणी घेऊन एका विषयाची माहिती उपलब्ध करुन देणे विषयी आदेशित केलेले आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मोघमपणे विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेलीआहे.अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकारणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय पारित करताना अशा बाबी विचारात घेतल्या असल्याचे दिसुन येत नाही. सबब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ०७.७.२०२३ रोजी पारित केलेला निर्णय अधिक्रमित करुन आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६४७३/२०२३ 9588 दि 13/8/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ९६ | द्वितीय अपील क्रं. ७३२३/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. आकारगिरी शिवशंकर गिरी<br>रा. हदगांव जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक,<br>परिक्षेत्र हदगांव जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा)<br>वनविभाग गांधी पुतळयाच्या मागे, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १३.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.उल्हास चव्हाण व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. भारत खोलबांडे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०५.७.२०२३ | वनपाल अनिता पांचाळ यांनी अतिक्रमण धारक धाबे यांना अतिक्रमण केल्याबदल दिलेली नोटीस |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २०.९.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन देणे विषयी आदेशित केलेले आहे. मात्र अपिलार्थी माहितीचे अवलोकन करण्यास कार्यालयात आलेले नसल्याने माहिती देणे शक्य झाले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन केलेले नाही. याप्रकरणी अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने त्यांना त्यांची बाजु मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊनही ते सुनावणी करिता अनुपस्थित आहेत. यावरुन त्यांना माहिती मिळविण्यामध्ये तसेच आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र॰श॰इं

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७३२३/२०२३ 9589 दि. 13/8/2025

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ९७ | द्वितीय अपील क्रं. ७३६२/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. योगेश ठाकुर पवार मेंडकी<br>रा. पो. मुंगशी ता. माहुर जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक,<br>परिक्षेत्र माहुर जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा)<br>वनविभाग, किनवट जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १६.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले.सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २२.६.२०२३ | वनविभाग अंतर्गत सन २०२०-२१ ते २०२२-२३ या कालावधीत केलेल्या कामाची माहिती मिळणे बाबत. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ११.८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशति केलेले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाची

अमंलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही. प्रस्तुत प्रकरणी माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक, परिक्षेत्र माहुर जि. नांदेड यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. सहायक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा)यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७३६२/२०२३ 9588 दि. 8/8/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ९८ | द्वितीय अपील क्रं. २७८९/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुगत चंद्रशेखर येरेकर, सहसंचालक कार्यालय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, भडकलगेट, छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी<br>शासकीय तांत्रिक प्रशाला, केंद्र देगलूर जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी,<br>शासकीय तांत्रिक प्रशाला, केंद्र देगलूर जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २५.४.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २०.१२.२०२२ | आपल्या कार्यालयात दि. १.१.२०२२ ते आजतागायत आलेले सर्व माहिती अधिकार पत्र व त्यांना पाठविण्यात आलेले उत्तरे |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की,अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी, शासकीय तांत्रिक प्रशाला, केंद्र देगलूर जि. नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३०दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील

तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, शासकीय तांत्रिक प्रशाला, केंद्र देगलूर जि. नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच दिनांक १५.९.२०२५ रोजी द्वितीय अपील क्रं. व सुनावणी दिनांकाचा संदर्भ नमुद करुन आयोगासमोर व्यक्तीशः उपस्थित राहून सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी,शासकीय तांत्रिक प्रशाला, केंद्र देगलूर जि. नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर विहीत मुदतीत अपेक्षित कार्यवाही केलेली नसल्याने अधिनियमातील कलम १९(६) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/ प्र.क्र.१५४/ ०७/०६,दि.३१.०३.२००८ नुसार कार्यवाही अनुसरावी.

४. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्व सुचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थितीत असल्याने त्यांचे विरुध्द सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण२०१५/ प्र.क्र.(२३३/१५) सहा.मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कारवाई करावी.

५. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

६. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रकाश

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२७८९/२०२३ 9489 दि. 8/8/2025 नोंदणीकृत टपालाने

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, भडकलगेट जवळ, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ९९ व १०० | द्वितीय अपील क्रं. ३१२४ व ३५५३/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शब्बीर खान हनीफ खान<br>रा. आजम कॉलनी दर्गारोड ता. जि. परभणी | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा अप्पर कोषागार अधिकारी,<br>जिल्हा कोषागार कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कोषागार अधिकारी,<br>जिल्हा कोषागार कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ३०.३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३)अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत.सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसंद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २०.१२.२०२३ | उपकोषागार अधिकारी बिलोली यांचे माहे ०७/२०२२ ते माहे ११/२०२२ या कालावधीत आपले कार्यालयाने आदेश निर्गमित कले त्याचे प्रत |
| १०.२.२०२३ | उपकोषागार अधिकारी धर्माबाद यांचे माहे ०७/२०२२ ते माहे ११/२०२२ या कालावधीत आपले कार्यालयाने आदेश निर्गमित कले त्याचे प्रत |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, आज रोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत.मात्र त्यांनी आयोगात सादर केलेल्या द्वितीय अपीलाच्या प्रयोजनामध्ये मागितलेली माहिती न देता दुसरीच माहिती दिली असे नमुद केलेले केले असल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहितीचे अधिनियमाचे कलम २(J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तीक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, नांदेड यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन माहितीचे अवलोकन द्यावे.अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली व नियमानुसार देय असलेली माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा कोषगार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, नांदेड यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह ०२ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

प्र.शा.इं.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./३१२४ व ३५५३/२०२३ 9490 दि. 8/8/2025